# रे.दि.मू.नं. ७३/२०१८ मधील नि. ५ खालील आदेश
## ( गणपत जाधव विरूध्द सुरेश जाधव )
## (आदेश पारीत दि. २७/११/२०१८)

**१.** प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दावा मिळकतीमध्ये हरकत अडथळा करू नये तसेच प्रतिवादी नं. ४ व ५ यांनी न्यायालयाचे आदेशाशिवाय अशी तुर्तातुर्त ताकीद मिळणेकरिता दाखल केले आहेत.

**२.** प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्यांचे म्हणणे नि. ३२ वर दाखल केलेले आहे. प्रतिवादी क्र. ३ यांनी त्यांचे म्हणणे नि. ३७ वर दाखल केले. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना संधी देवुन सुध्दा त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले नाही.

**३.** दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

**४.** वादीचे असे कथन आहे की मौजे कवठे ता.खंडाळा येथील गट क्र. ५८४ क्षेत्र ३६आर व गट नं. ५८६ क्षेत्र ४आर ही मिळकत वादीची मालकी वहिवाटीची आहे. यापुढील सदरील मिळकतीस दावा मिळकत असे संबोधण्यात येईल.

**५.** अर्जदार, गैरअर्जदार यांचे म्हणणे व अभिलेखावर दाखल केलेले दस्तऐवज याचे अवलोकन करता खालील मुद्दे माझया विचारार्थ येतात, त्याचे निष्कर्ष कारणांसहीत खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी असे सिध्द् कारतो काय की, प्रथमदर्शनी केस वादीचे बाजूने आहे ? | .... होकारार्थी. |
| २. | वादी असे सिध्द् करतो काय की, न्यायीक हक्काचा समतोल वादीचे बाजूने आहे? | .... होकारार्थी. |
| ३. | वादी असे सिध्द् करतो काय की तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश न मिळाल्यास वादी यांचे अपरिमित नुकसान होईल ? | .... होकारार्थी. |
| ४. | आदेश काय ? | अर्ज मंजूर करणेत येतो. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र. १ ते ३ करिता:—</u>**

६. वादीच्या विधिज्ञांनी लेखी युक्तीवाद नि. ५२ वर दाखल केलेला आहे.

७. प्रतिवादी नं. १ व २ यांच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, वादीने सदरील दावा हा निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केलेला असून प्रतिवादी नं. ४ व ५ हे सरकारी नोकरदार असून दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ८० अन्वये त्यांना दावा पूर्व नोटीस दिलेली नाही किंवा नोटीस न देणेबाबत न्यायालयाची परवानगी घेतलेली नाही. वादी यांनी प्रतिवादी क्र. ४ व ५ यांचे विरूध्द मागणी मागितलेली असून त्यांना नोटीस न दिल्या कारणाने वादीचा दावा फेटाळण्यात यावा अशी मागणी केली. तसेच रे.दरखास्त क्र. १७/०२ ही प्रलंबीत असून वादीने दाव्यामध्ये दिलेल्या चतु:सिमा या चुकीच्या आहेत ही बाब नमूद केली. वादीने दावा मिळकती म्हणून संपूर्ण मिळकत नमूद केली आहे. परंतू वादीचा गट नं. ५८४ व ५८६ मध्ये संपूर्ण मालकी हक्क नाही म्हणून वादीचा नि. ५ चा अर्ज नामंजूर करणेची मागणी केली.

८. प्रतिवादी नं. ३ यांचे विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, वादी यांनी दाखल केलेला दावा हा चालण्यायोग्य नाही, वादीने दावा मिळकतीचे चुकीचे वर्णन नमूद केलेले आहे. त्यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, भिकू जाधव व गणपत जाधव वगैरे यांचे मध्ये ६७/१९९४ हा वाटपासाठी दावा दाखल झाला होता. तो दावा अंशत: मंजूर झाला आहे. तसेच त्यांचेमध्ये रेग्यु.दरखास्त १७/०२ ही प्रलंबीत आहे. तसेच तहसिलदार खंडाळा यांचेकडे वाटपतक्ता तयार झालेला आहे. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी तहसिलदार खंडाळा यांचे आदेशान्वये व दरखास्तीच्या कामी ताबा देणेकरिता मोजणी करणेकामी गेले होते. प्रतिवादी क्र. ४ व ५ हे सरकारी नोकरदार असून त्यांचेविरूध्द दावा दाखल करणेपूर्वी दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ८० अन्वये दावा पूर्व नोटीस दिलेली नाही. वरील कारणास्तव वादीचा तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजूर करणेची मागणी केली.

९. वादीने सदरील दावा हा निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केलेला असून तुर्तातुर्त मनाई अर्जामध्ये वादीने प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दावा मिळकतीमध्ये हरकत अडथळा करू नये व प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी मोजणी करू नये अशा आदेशाची मागणी केलेली आहे. वादीने तुर्तातुर्त मनाई हुकूमाच्या

अर्जामध्ये दावा मिळकतीमध्ये वादीची वहिवाट असून ७/१२ उता—यावरती वादीच्या नावाची नोंद असल्याचे कथन केले आहे. प्रतिवादी यांनी वादीस मोजणी करणेपूर्वी नोटीस दिली नसल्याने व प्रतिवादी क्र. १ ते ३ वादीच्या ताब्यास हरकत अडथळा करत असल्याने वादीने सदरील तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्ज दाखल केलेला आहे.

**१०.** वादीने नि. ७ वर गट क्र. ५५४ चा व नि. ८ वर गट नं. ५८६ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. सदरील उता—याचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी असे दिसून येते की, दावा मिळकतीवरती भिकू महादू जाधव यांचा ८आणे हिस्सा होता. तसेच भाउसो जाधव यांचा ४आणे हिस्सा व गेणबा जाधव यांचा ४आणे हिस्सा होता. यावरून दावा मिळकतीवरील वादी ४आणे हिश्याचा मालक असल्याचे दिसून येते.

**११.** प्रतिवादी क्र. ३ यांनी त्यांच्या कैफियतीसोबत रे.दि.मू.नं. ६७/९४ च्या हुकूमनाम्याची प्रत, तसेच रे.दि.मू.नं. ६७/९४ च्या न्यायनिर्णयाची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. रे.दि.मू.नं. ६७/९४ हा भिकू महादेव जाधव यांनी गणपत महादेव जाधव, संपत महादेव जाधव, भाउ रामजी जाधव व गेणबा रामजी जाधव यांचेविरूध्द दाखल केलेला होता. सदरील दावा हा अंशत: मंजूर करणेत आलेला आहे. सदरील दाव्याच्या हुकूमनाम्याच्या प्रतीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की वादी व प्रतिवादी क्र. १ व २ हे सख्खे भाउ होते. प्रतिवादी क्र. ३ व ४ हे वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांचे चुलते असून आणेवारीत त्यांच्या गटाला हिस्सा असल्यामुळे त्यांनी कब्जाच्या वेळी हरकत घेवू नये म्हणून त्यांना त्या दाव्यामध्ये पक्षकार म्हणून समाविष्ठ केले होते. सदरील दाव्याचा निकाल दि. १०/०४/२००१ रोजी झालेला आहे. वादीचे असे कथन आहे की वादीचे वडिल हे दि. १६/१०/१९९८ रोजी मयत झालेले आहेत. रे.दि.मू.नं. ६७/९४ च्या न्यायनिर्णय व हुकूमनाम्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की प्रतिवादी क्र. ३ भाउ जाधव हे मयत झाल्यानंतर त्यांचे वारसांना त्या दाव्याचेकामी पक्षकार म्हणून समाविष्ठ केलेले नव्हते.

**१२.** रे.दि.मू.नं. ६७/९४ मध्ये आणेवारीत हिस्सा असल्याने त्या दाव्यातील प्रतिवादी क्र. ३ यांना दाव्याचेकामी पक्षकार म्हणून समाविष्ठ केलेले होते. परंतू ते

मयत झाल्यानंतर त्यांचे वारसांना दाव्याचेकामी पक्षकार म्हणून समाविष्ठ केलेले नाही. प्रतिवादी क्र. ३ यांनी यादी नि. ५७ वरती रे.दरखास्त क्र. १७/०२ ची प्रत दाखल केली असून त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दरखास्तीमधील जे. डी नं. ३ चे नाव नि. २५ प्रमाणे कमी केलेले आहे. यावरून असे दिसून येते की, दरखास्तीमध्ये सुध्दा प्रतिवादी क्र. ३ यांचे वारसांना समाविष्ठ केलेले नाही. प्रतिवादी यांनी मा.तहसिलदार खंडाळा, यांनी दिलेल्या निकालपत्राची प्रत अभिलेखावर दाखल केली असून त्यांचे निकालाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी निकालपत्रामध्ये प्रतिवादी क्र. ३ म्हणजेच भाउ रामजी जाधव हे दि. १६/१०/१९९८ रोजी मयत असल्याचे नमूद केले आहे. तहसिलदार यांचेकडील प्रकरणामध्ये सुध्दा प्रतिवादी भाउ जाधव यांचे वारसांना पक्षकार म्हणून समाविष्ठ केले नव्हते.

**१३.** वरील कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी असे दिसून येते की, रे.दि.मू.नं. ६७/९४ मध्ये या दाव्यातील वादी यांचे वडिल प्रतिवादी क्र. ३ म्हणून समाविष्ठ केले होते कारण दावा मिळकतीमध्ये आणेवारीमध्ये त्यांचा हिस्सा होता, परंतू ते मयत झाल्यानंतर त्यांचे वारसांची नोंद सदरील दाव्यामध्ये घ ेतलेली नाही तसेच दरखास्तीमध्ये सुध्दा भाउ जाधव यांचे वारसांना पक्षकार म्हणून समाविष्ठ केलेले नाही. प्रतिवादी क्र. ३ ने दाखल केलेल्या हुकूमनाम्यावरून असे दिसून येते की, कब्जावेळी हरकत येवू नये म्हणून प्रतिवादी क्र. ३ व ४ यांना रे.दि. मू.नं. ६७/९४ मध्ये समाविष्ठ केले होते. परंतू प्रतिवादी क्र. ३ मयत झाल्यानंतर त्यांचे वारसांना सदरील दाव्याचे व नंतर दरखास्तीचे कामी अभिलेखावर घेणे गरजेचे होते परंतू प्रतिवादी नं. ३ च्या वारसांना दाव्यात व दरखास्तीमध्ये समाविष्ठ केलेले नाही. प्रतिवादी क्र. ३ च्या वडिलांचा दाव्यामध्ये ४आणे हिस्सा होता त्यामुळे दावा मिळकतीचा सरस निरस मानाने वाटप करतेवेळी प्रतिवादी क्र. ३ यांची वहिवाट कोणत्या क्षेत्रामध्ये आहे हे पाहण्याकरिता प्रतिवादी क्र. ३ हे दाव्यात व दरखास्तीमध्ये व तहसिलदार यांचे पुढील प्रकरणांमध्ये आवश्यक पक्षकार होते. परंतू त्यांना सदरील प्रकरणांमध्ये समाविष्ठ केलेले नाही.

**१४.** तहसिलदार यांचे आदेशानंतर प्रतिवादी क्र. ४ व ५ हे दावा मिळकतीची मोजणी करणेकरिता दावा मिळकतीमध्ये गेले होते. रे.दि.मू.नं. ६७/९४

मधील न्यायनिर्णयान्वये भिकू जाधव यांचा दावा मिळकतीमध्ये ८आणे हिस्सा आहे तसेच वादीचे वडिल भाउ जाधव यांचा सुध्दा दावा मिळकतीमध्ये ४आणे हिस्सा आहे. दरखास्तीचे कामी या दाव्यातील प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी मोजणी करणेपूर्वी वादी यांना कोणत्याही प्रकारची नोटीस दिलेली नाही तसेच वादी हे त्यांचे वडिल मयत झाल्यानंतर रे.दि.मू.नं. ६७/९४ व दरखास्त क्र. १७/०२ मध्ये पक्षकार नव्हते.

**१५.** प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी वादीला नोटीस दिली नसल्याने व वादीचा दावा मिळकतीमध्ये ४आणे हिस्सा असल्याने प्रतिवादी क्र. ४ व ५ नक्की कोणत्या क्षेत्राची मोजणी करणार आहेत याबाबत वादीला पूर्व सुचना देणे आवश्यक होते. वादी याचा दावा मिळकतीमध्ये ४आणे मालकी हक्क व कब्जा असल्याने व प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी वादीच्या वहिवाटीस हरकत अडथळा केल्यास वादीचे अपरिमीत असे नुकसान होणार आहे.

**१६.** प्रतिवादी क्र. १, २ व प्रतिवादी क्र. ३ यांचे विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. ४ व ५ हे सरकारी नोकर असल्याने त्यांना दावा पूर्व नोटीस देणे आवश्यक होते. सदरील दावा दाखल झाला त्यावेळी सहा.अधिक्षक यांनी कोणताही आक्षेप घेतला नसल्याचे दिसून येते, आक्षेप नसल्याने सदरील दाव्यास नंबर देणेत आला. प्रतिवादी क्र. ४ व ५ हे जरी सरकारी नोकरदार असले तरी वादी यांची शासनाविरूध्द कोणतीही मागणी नाही. तहसिलदार यांचे आदेशाने प्रतिवादी क्र. ४ व ५ हे दाव्याची मोजणी करणेकरिता गेले होते, त्यामुळे सदरील प्रकरणामध्ये दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ८० प्रमाणे नोटीसची आवश्यकता नसल्याचे दिसून येते.

**१७.** दावा मिळकतीच्या ७/१२ उता—याचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी असे दिसून येते की दावा मिळकतीमध्ये वादीचा ४आणे हिस्सा आहे. प्रतिवादी क्र. १, २ व मंगल व शकूंतला यांचा ८आणे हिस्सा असल्याचे दिसून येते. रे.दि.मू.नं. १७/०२ व तहसिलदार खंडाळा यांचे आदेशान्वये प्रतिवादी क्र. ४ व ५ हे मोजणी करणेकरिता दावा मिळकतीमध्ये गेले होते, परंतू दावा मिळकतीची मोजणी करणेपूर्वी वादीला कोणत्याही प्रकारची नोटीस दिली नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. वादीचा दावा मिळकतीमध्ये हक्क व हितसंबंध असल्याने वादीला मोजणीची

नोटीस दिली नसल्याने व प्रतिवादी क्र. १ ते ३ हरकत अडथळा करत असल्याने दावा मिळकतीची मोजणी झाल्यास वादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. वादीने सकृतदर्शनी केस सिध्द् केलेली आहे. न्यायीक हक्काचा समतोल हा वादीच्या बाजूने आहे. दावा मिळकतीची मोजणी झाल्यास वादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. सबब वरील कारणांचा विचार करून मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी देतो व मुद्दा क्र. ४ करिता खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. नि. ५ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यत दावा मिळकतीमधील वादीचे हिश्यास हरकत अडथळा करू नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश देणेत येतो.

३. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यत वादीच्या दावा मिळकतीची मोजणी करू नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम देणेत येतो.

४. सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी.

**दि. २७/११/२०१८**

**( अ.ब.चव्हाण )**
**सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**खंडाळा.**